The Name Of Quality

Knowledge is Power

Founder : Manohar E. Patil

# Reliable Academy®

ISO 9001 : 2015



महाराष्ट्र लोकसेवा आयोग — View More Info

BANK — View More Info

UPSC — View More Info

SSC — View More Info

INDIAN RAILWAYS — View More Info


परीक्षाभिमुक | अभ्यासक्रम | परीक्षेचे विश्लेषण | पुस्तक सूची | निकाल | इतिहास | भूगोल | राज्यशास्त्र | अर्थशास्त्र | विज्ञान | CSAT | कृषी विज्ञान

मराठी | English | कायदे | HRD | संगणक व तंत्रज्ञान | मुलाखत | MPSC पूर्व GS सराव प्रश्नसंच | MPSC CSAT सराव प्रश्नसंच

PSI STI ASO संयुक्त प्रश्नसंच | Excise SI Pre संयुक्त प्रश्नसंच

1


परीक्षाभिमुक




महाराष्ट्र विधानसभा चालू घडामोडी सराव प्रश्न

View More



कृषी सेवा परीक्षा चालू घडामोडी आणि संगणक तंत्रज्ञान

View More



कृषी सेवा परीक्षा : सामान्य अध्ययन (राजकीय यंत्रणा आणि भूगोल)


View More

एमपीएससी मंत्र : कृषी सेवा परीक्षा सामान्य अध्ययन प्रश्न विश्लेषण


View More


चालू घडामोडी  सराव प्रश्न
View More


महाराष्ट्र कृषी सेवा पूर्वपरीक्षा  मराठी प्रश्न विश्लेषण
View More



एमपीएससी मंत्र : महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा – मुख्य परीक्षा आणि मुलाखत
View More


व्यक्तिविशेष सराव प्रश्न
View More


महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा पूर्व परीक्षा
View More


एमपीएससी मंत्र : महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा
View More

## महाराष्ट्र विधानसभा चालू घडामोडी सराव प्रश्न



7558    31-Dec-2019, Tue

Share

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका आणि त्यानंतरचा घटनाक्रम मागील लेखामध्ये (१४ डिसेंबर) देण्यात आला आहे. या घटनाक्रमामध्ये परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचारात घ्यावयाचे मुद्दे आहेत – विधानसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुका, दोन्ही सभागृहांचे अध्यक्ष, दोन्हींची सदस्य संख्या व मतदारसंघ, मंत्रिमंडळ, विश्वास व अविश्वास ठराव, मंत्र्यांच्या शपथेचे नमुने, पक्षांतरबंदी कायदा, राष्ट्रपती राजवट, राज्यपालांची भूमिका व अधिकार, केंद्र व राज्य संबंध इत्यादी. मागील लेखामध्ये याबाबतचे काही सराव प्रश्न देण्यात आले होते. या आणि पुढील लेखामध्ये उर्वरित मुद्द्यांबाबत सराव प्रश्न देण्यात येत आहेत.

प्रश्न १.
अ.   राष्ट्रपती, पंतप्रधान आणि राज्यपाल यांनी पदग्रहणाच्या वेळी घ्यावयाच्या शपथेचे नमुने राज्यघटनेच्या मूळ दस्तावेजामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.
ब.   सरन्यायाधीश, राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांनी पदग्रहणाच्या वेळी घ्यावयाच्या शपथेचे नमुने राज्यघटनेच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.
वरीलपकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त?
पर्याय
१) अ आणि ब दोन्ही
२) केवळ अ
३) केवळ ब
४) अ आणि ब दोन्ही नाही.

प्रश्न २. विधान परिषदेच्या सभापतींबाबत पुढीलपकी कोणती तरतूद राज्यघटनेमध्ये समाविष्ट आहे?

१) विधान परिषदेचे सभापती हे त्या सभागृहाचा सदस्य नसतात.

२) विधान परिषदेच्या सभापतींना सदनाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने पदावरून हटविता येते.

३) विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाच्या अध्यक्षपदी विधान परिषदेचे सभापती असतात.

४) विधान परिषदेच्या सभापतींना सदनामध्ये ठरावावर मत देण्याचा अधिकार नाही.

प्रश्न ३. पक्षांतरबंदी कायद्याबाबत पुढीलपकी कोणते विधान चुकीचे आहे?

१) सन १९८५च्या बावन्नाव्या घटनादुरुस्तीने हा कायदा राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आला.

२) राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टामध्ये याचा समावेश करण्यात आला आहे.

३) राज्यघटनेच्या कलम १०२ (२) आणि कलम १९१ (२)च्या तरतुदींचे स्पष्टीकरण म्हणून याचा समावेश करण्यात आलाआहे.

४) कायदेमंडळातील राजकीय पक्षांच्या सदस्यांच्या एकतृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले किंवा वेगळा पक्ष स्थापन केला तर अशा सदस्यांना या कायद्यातील तरतुदी लागू होत नाहीत.

प्रश्न ४. महाराष्ट्र राज्यामध्ये लागू झालेल्या आणीबाणी, त्यांच्याशी संबंधित कलम आणि कालावधी पुढील विधानांमध्ये देण्यात आले आहेत. यापकी कोणता पर्याय योग्य आहे?

१) घटनात्मक यंत्रणा कोलमडणे – कलम ३५६ – १२ ते २३ नोव्हेंबर २०१९

२) राष्ट्रपती राजवट – कलम ३५८ – २८ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०१४

३) घटनात्मक यंत्रणा कोलमडणे – कलम ३५८ – १७ फेब्रुवारी ते ८ जून १९८०

४) आर्थिक आणीबाणी – कलम ३६० – २५ जून १९७५ ते २३ मार्च १९७७

उत्तरे व स्पष्टीकरणे प्र. क्र. १) योग्य पर्याय क्र. (३)

राज्यघटनेच्या मूळ दस्तावेजामध्ये केवळ राष्ट्रपती आणि राज्यपाल यांनी पदग्रहणाच्या वेळी घ्यावयाच्या शपथेचे नमुने समाविष्ट करण्यात आले आहेत. केंद्र व राज्यांचे मंत्री, संसद व राज्य विधानमंडळांचे सदस्य, सर्वोच्च व उच्च न्यायालयांचे न्यायाधीश, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक या घटनात्मक पदांवरील व्यक्तींनी पदग्रहणाच्या वेळी घ्यावयाच्या शपथेचे नमुने राज्यघटनेच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री हे केंद्र आणि राज्य शासनाचे मंत्री म्हणूनच शपथ घेतात.

प्र. क्र. २) योग्य पर्याय क्र. (२)

विधान परिषदेचे सभापती त्या सभागृहाचा सदस्य असतात. सदनातील सदस्य त्यांच्यामधूनच सदनाचे सभापती व उपसभापती यांची निवड करतात. विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाच्या अध्यक्षपदी विधानसभा अध्यक्ष असतात.

विधान परिषद सभापती हे सदनातील ठरावांवर प्रथमत: मतदान करत नाहीत. जर ठरावाच्या बाजूने व विरोधात समान मते पडली तर निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतींना असतो.

प्र. क्र. ३) योग्य पर्याय क्र. (४)

बावन्नाव्या घटनादुरुस्तीने कायदेमंडळातील राजकीय पक्षांच्या सदस्यांच्या एकतृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले किंवा वेगळा पक्ष स्थापन केला तर अशा सदस्यांना या कायद्यातील तरतुदी लागू होणार नाहीत अशी तरतूद करण्यात आली होती. सन २००३च्या एक्याणवाव्या घटनादुरुस्तीने ही संख्या बदलून एक तृतीयांशऐवजी दोन तृतीयांशवर नेण्यात आली.

प्र. क्र. ४) योग्य पर्याय क्र. (१) योग्य विधाने पुढीलप्रमाणे

१) घटनात्मक यंत्रणा कोलमडणे (म्हणजेच राष्ट्रपती राजवट मात्र हा शब्दप्रयोग राज्यघटनेमध्ये समाविष्ट नाही) – कलम ३५६ – २८ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०१४.

२) घटनात्मक यंत्रणा कोलमडणे (राष्ट्रपती राजवट) – कलम ३५६ – १७ फेब्रुवारी ते ८ जून १९८०

३) कलम ३५२ अन्वये संपूर्ण देशामध्ये २५ जून १९७५ ते २३ मार्च १९७७ दरम्यान आणीबाणी लागू

Apps
Blogs
HELP LINE

कृषी सेवा परीक्षा चालू घडामोडी आणि संगणक तंत्रज्ञान



266 31-Dec-2019, Tue

Share

महाराष्ट्र कृषी सेवा पूर्वपरीक्षेमधील 'चालू घडामोडी' आणि 'संगणक तंत्रज्ञान' या घटकांची तयारी कशा प्रकारे करावी याबाबत या लेखामध्ये चर्चा करण्यात येत आहे.

चालू घडामोडी

साधारणपणे परीक्षा कालावधीपूर्वीच्या आठ ते दीड महिना अशा कालावधीतील घडामोडींवर आधारित प्रश्न विचारण्यात आलेले आहेत.

राज्यव्यवस्थेशी संबंधित चालू घडामोडींबाबत घटनात्मक तरतुदी, तशी प्रत्यक्ष तरतूद नसल्यास कायदेशीर बाजू समजून घेणे आवश्यक आहे. चर्चेतील विधेयके आणि कायदे यांमधील तरतुदी बारकाईने समजून घ्याव्या आणि यासाठी मूळ दस्तावेज वाचणे हाच उत्तम पर्याय आहे.

व्यक्तिविशेष, शासकीय योजना यांबाबत नेमकेपणाने व शक्यतो बहुविधानी प्रश्न विचारण्यात आले आहेत.

चर्चेतील व्यक्ती, निधन, नेमणुका, आपापल्या क्षेत्रात वैशिष्टय़पूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्तींबाबत त्यांचे कार्यक्षेत्र, वैशिष्टय़पूर्ण कामगिरी, नियुक्त्या, बढती असल्यास महत्त्वाच्या पदावरील निवड, प्राप्त पुरस्कार यांचा आढावा घ्यायला हवा. त्यांचे कार्य, संस्था, पुस्तके, प्रसिद्ध विधाने यांची जास्तीतजास्त माहिती करून घेणे आवश्यक आहे.

मागील पाच ते सात वर्षांमधील शासकीय योजनांचे उद्दिष्ट, सुरू झालेले वर्ष, तरतुदी, लाभार्थ्यांचे निकष, अंमलबजावणी यंत्रणा, असल्यास अपवाद, असल्यास कालमर्यादेतील उद्दिष्टे यांचे टेबल करावे.

चित्रपट, संगीत, पत्रकारिता, प्रशासन, संशोधन, शैक्षणिक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त व्यक्ती माहीत असाव्यात. भारतातील व्यक्तींना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असल्यास त्यांच्याबाबतची अतिरिक्त माहिती असणे आवश्यक आहे.

पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती व त्यांचे कार्यक्षेत्र, शौर्य पुरस्कारप्राप्त व्यक्ती माहीत असाव्यात.

महाराष्ट्र शासनाचे विविध पुरस्कार, राज्य स्तरावरील महत्त्वाची संमेलने यांची माहिती असायला हवी.

भारताचे शेजारी देशांशी असलेले विवाद किंवा नवे संयुक्त प्रकल्प, करार यांचा परिपूर्ण आढावा घेणे आवश्यक आहे. यामध्ये संबंधित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, संबंधित सीमावर्ती राज्य, प्रकल्पाचा फायदा, असल्यास त्याबाबतचे चर्चेतील मुद्दे यांचा आढावा घ्यावा.

संरक्षण घटकामध्ये भारत व इतर देशांचा संयुक्त युद्धाभ्यास यांचे कोष्टक पाठच करावे. दरवर्षी अभ्यासाचे ठिकाण आणि कालावधी अद्ययावत करणे इतकाच उजळणीचा भाग मग शिल्लक राहतो. भारतातील शस्त्रास्त्रे व संरक्षण यंत्रणा यांचे नाव, प्रकार, वैशिष्टय़, वापर, विकसित करणारी संस्था, असल्यास अद्ययावत चाचणीचे परिणाम या मुद्दय़ांची टिप्पणे काढावीत.

उपग्रह प्रक्षेपण यंत्रणा व भारताने प्रक्षेपित केलेले उपग्रह, अवकाश अभियाने यांची अद्ययावत माहिती बारकाव्यासहित करून घ्यावी.

महत्त्वाच्या खेळांचे विश्वचषक, ऑलिम्पिक, आशियाई स्पर्धा, इतर महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, त्यातील विक्रम, भारत / महाराष्ट्र यांची कामगिरी यांचा आढावा घ्यायला हवा.

चर्चेतील महत्त्वाची पुस्तके व त्यांचे लेखक, चर्चेतील लेखकांबाबतच्या महत्त्वाच्या बाबी तसेच साहित्य क्षेत्रातील महत्त्वाचे पुरस्कार व विजेते यांची टिप्पणे काढणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे निर्देशांक/ अहवाल व त्यातील भारताचे अद्ययावत व मागील वर्षीचे स्थान, प्रकाशित करणारी संघटना, महत्त्वाच्या निर्देशांकांचे निकष हे मुद्दे लक्षात घ्यावेत.

केंद्रीय व राज्याच्या अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी माहीत असायला हव्यात. आर्थिक विकास दर, बँक दर, जीएसटी, आर्थिक क्षेत्रातील नवे निर्णय, जीडीपी, जीएनपी यांची अद्ययावत माहिती असायला हवी.

संगणक व माहिती तंत्रज्ञान

संगणक व माहिती तंत्रज्ञान या घटकाचा विस्तृत अभ्यासक्रम दिलेला असला तरी आजवर या घटकावर एक ते दोन प्रश्न विचारलेले दिसतात. मात्र कोणत्याही एका घटकाची प्रश्नसंख्या निश्चित नसल्याने पुढे या घटकावरचे

प्रश्न वाढूही शकतात. त्यामुळे याचा किमान आढावा आणि तयारी आवश्यक आहे. या घटकाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे –

वेगवेगळ्या क्षेत्रांतील संगणकाचा वापर 2 संधी आणि मर्यादा

माहिती तंत्रज्ञान – इंटरनेट, ईमेल, ई कॉमर्स, कृषीविषयक माहितीची संकेतस्थळे

कृषी क्षेत्रावर भर देऊन ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, लघुउद्योग, दळणवळण, बँकिंग, व्यापार, प्रशासन अशा क्षेत्रांतील संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या वापराचा आढावा घ्यावा. यामध्ये वापराची संधी, त्याचे फायदे, तोटे, अपेक्षित परिणाम, समस्या अशा मुद्दय़ांचा विचार करता येईल.

इंटरनेट, ईमेल, ई कॉमर्स या मुद्दय़ांचा अभ्यास करताना आधी मूलभूत बाबी समजून घेऊन मग त्यांचे उपयोजन लक्षात घेणे आवश्यक आहे. इंटरनेट म्हणजे माहितीजालावरील माहिती संप्रेषणाचे घटक समजून घ्यावेत. विस्तारक्षेत्राचा आकार, संप्रेषणाचे माध्यम आणि संप्रेषणाची गती या निकषांच्या आधारे या घटकांचे प्रकार समजून घ्यावेत.

ई कॉमर्स ही संकल्पना मुळातून समजून घेऊन तिचा उद्देश, वेगवेगळ्या क्षेत्रांतील वापर, उपयोग यांचा आढावा घ्यावा. E-NAM सारख्या कृषिमाल विक्रीबाबतच्या पोर्टल्सची व्यवस्थित माहिती करून घ्यायला हवी.

शासकीय पोर्टलसहित हवामान अंदाज, कृषिमाल विपणन, मृदा, खते, बियाणे, इतर कृषी अवजारे व त्यांच्या वापरपद्धती यांचे प्रशिक्षण, प्रक्रियाकृत कृषिमालाशी संबंधित अशा विविध संकेतस्थळांची माहिती असणे आवश्यक आहे. या संकेतस्थळांचा उद्देश, वापर, उपलब्ध सेवा, माहिती, कार्यपद्धती, फायदे, तोटे, मर्यादा इत्यादी बाबी पाहाव्यात. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शासकीय आणि खाजगी संकेतस्थळांची एकत्रित माहिती krishi.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यातील महत्त्वाच्या पोर्टल्सची माहिती करून घ्यावी.

## कृषी सेवा परीक्षा : सामान्य अध्ययन (राजकीय यंत्रणा आणि भूगोल)



2868 20-Dec-2019, Fri

Share

महाराष्ट्र कृषी सेवा पूर्वपरीक्षेच्या मागील प्रश्नपत्रिकांमध्ये सामान्य अध्ययन घटकावर विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या विश्लेषणाच्या आधारे भारताचा इतिहास आणि सामाजिक सुधारणा या घटकांची तयारी कशी करावी याबाबत मागील लेखामध्ये चर्चा करण्यात आली. या लेखामध्ये भारतीय राजकीय यंत्रणा आणि भूगोल या घटकांची तयारी कशा प्रकारे करावी याबाबत चर्चा करण्यात येत आहे.

भारतीय राजकीय यंत्रणा

यामध्ये प्रत्यक्ष प्रशासन व शासन धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व त्यासंबंधी विविध घटकांचा समावेश होतो. केंद्र व राज्य पातळीवरील प्रशासनामध्ये कायदेमंडळे आणि प्रशासकीय कार्यपद्धतींचा समावेश होतो.

संसद आणि विधानमंडळांची रचना, कार्यकाळ, पदाधिकारी, सदस्य संख्या, निवडणूक, लोकप्रतिनिधित्व कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी, मंत्रिमंडळविषयक तरतुदी या बाबी बारकाईने अभ्यासाव्यात.

संसद आणि विधानमंडळांचे कामकाज, त्यांच्या समित्या, रचना, कायरे, अधिकार, कायदा निर्मिती प्रक्रिया, अर्थसंकल्पविषयक कामकाज यांच्या बाबत घटनेतील तरतुदी व्यवस्थित समजून घ्याव्यात. त्यासाठी त्यांची कामकाज नियमावली पाहणे आवश्यक आहे.

राष्ट्रपती व राज्यपालांचे अधिकार, कायरे, नेमणूक याबाबतच्या तरतुदी समजून घ्याव्यात.

स्थानिक प्रशासनामध्ये ७३वी व ७४वी घटनादुरुस्त्यांमधील तरतुदी, त्या अन्वये स्थापन केलेल्या समित्या, स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सोपवलेले विषय हे मुद्दे समजून घ्यावेत.

ग्रामीण प्रशासनामध्ये जिल्हा ते ग्रामपंचायत अशा उतरंडीचा कोष्टक पद्धतीत अभ्यास करता येईल. यामध्ये पुन्हा महसुली व विकासात्मक व पोलीस प्रशासन वेगवेगळे लक्षात घ्यायला हवे. अधिकाऱ्यांची उतरंड व त्यांचे अधिकार, कार्य, नेमणूक, राजीनामा, पदावरून काढून टाकणे या बाबी समजून घ्यायला हव्यात. विशेषत: तलाठी आणि पोलीसपाटील या पदांबाबत अभ्यासक्रमामध्ये वेगळा उल्लेख असल्याने सांगोपांग अभ्यास करायला हवा. या संपूर्ण घटकाबाबत चालू घडामोडींची माहिती असायला हवी.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, त्यांच्या निवडणुकांबाबतच्या तरतुदी, कार्यकाळ, विसर्जति करण्याचे अधिकार, राज्य निवडणूक आयोग, त्याची रचना, काय्रे व अधिकार यांचा आढमवा घ्यावा.

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा त्यांचे प्रकार, निवडणूक, रचना, काय्रे, अधिकार इ. बाबी व्यवस्थित समजून घेऊन अभ्यास करावा.

भारताचा भूगोल

महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह भारताचा भूगोल अभ्यासायचा आहे. प्रश्नांचे स्वरूप पाहता पूर्णपणे तथ्यात्मक आणि बहुविधानी संकल्पनात्मक असे वैविध्य दिसते. त्यामुळे मूलभूत आणि नकाशावर आधारित असा अभ्यास आवश्यक आहे.

देशाच्या व महाराष्ट्राच्या मुख्य हवामान विभागांचा नकाशाच्या आधारे अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाची भौगोलिक वैशिष्टय़े, हवामानाचे वैशिष्टय़पूर्ण घटक, त्यामुळे होणारी मृदा, पिके, इतर आíथक उत्पादनांमध्ये या वैशिष्टय़ांचे योगदन या बाबी समजून घ्याव्यात. महाराष्ट्राचे हवामान विभाग हे दक्षिणोत्तर पसरले आहेत. त्यांचा पश्चिम ते पूर्व अशा क्रमाने अभ्यास केल्यास मान्सून, पर्जन्याचे वितरण, तापमानातील फरक  यांचा तुलनात्मक अभ्यासही शक्य होईल.

नदी आणि पर्वतप्रणालीचा नकाशावरील अभ्यास करतानाच त्यांचे आíथक महत्त्व, पर्जन्यनिर्मिती व हवामान इत्यादीमधील महत्त्व या बाबींचाही अभ्यास आवश्यक आहे. या प्रणालीची उत्तर ते दक्षिण क्रमाने सलगता समजून घ्यायला हवी. यामध्ये महाराष्ट्रातील नदी – पर्वतांचा अभ्यास बारकाईने करणे आवश्यक आहे तर भारतातील प्रणालींमध्ये ठळक प्रणालींचा आढावा घ्यावा.

महाराष्ट्रातील महत्त्वाची वने, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, जैवविविधता क्षेत्रे यांचा भौगोलिक व पर्यावरणीय वैशिष्टय़े व महत्त्व या दृष्टीने अभ्यास करावा. वनांचे आíथक महत्व समजून घ्यावे. देशातील वनक्षेत्रांपकी ठळक महत्त्वाच्या क्षेत्रांचा आढावा घ्यावा.

महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन होणारी क्षेत्रे, त्यांची भूशास्त्रीय रचना, उत्पादनाचे प्रमाण व गुणवत्ता, खाणींचे प्रकार या बाबी समजून घ्याव्यात.

भारतातील व महाराष्ट्रातील खडकांचे प्रकार खडकांचा प्रकार, निर्मिती, कोठे आढळतो, भौगोलिक व वैज्ञानिक वैशिष्टय़े, रचना, आíथक महत्त्व या मुद्यांच्या अनुषंगाने अभ्यासावेत.

प्रशासकीय विभागातील जिल्हे, त्यांची मुख्यालये व त्यांची वैशिष्टय़े, जिल्ह्य़ांची कालानुक्रमे निर्मिती, महत्त्वाची शहरे, आíथक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठिकाणे यांची कोष्टकामध्ये टिप्पणे काढावी.

राज्यातील जिल्ह्य़ांच्या सीमा, इतर राज्यांच्या सीमेवरील जिल्हे, जिल्ह्य़ांच्या सीमा म्हणून उपयुक्त ठरणारी नदी / डोंगर / नसíगक भूरूपे या बाबी अभ्यासक्रमामध्ये वेगळ्याने नमूद केलेल्या नसल्या तरी त्यांचा अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे राज्याचा राजकीय नकाशाही व्यवस्थित अभ्यासणे आवश्यक आहे.

भारताच्या व राज्याच्या लोकसंख्येचा साक्षरता, नागरीकरण, लिंग गुणोत्तर, रोजगार, लोकसंख्येची घनता या मुद्यांच्या आधारे आढावा घ्यावा. जन्मदर, मृत्युदर, बाल लिंग गुणोत्तर, माता मृत्युदर, अर्भक मृत्युदर, बाल मृत्युदर यांची माहिती असायला हवी. सन २००१ व २०११मधील जनसंख्या किंवा संबंधित आयामांमध्ये झालेले बदल यांचा तुलनात्मक अभ्यास कोष्टकामध्ये टिप्पणी काढल्यास चांगल्या प्रकारे  होईल.


एमपीएससी मंत्र : कृषी सेवा परीक्षा सामान्य अध्ययन प्रश्न विश्लेषण




1694 13-Dec-2019, Fri

Share

राज्य लोकसेवा आयोगाकडून सन २०२० मध्ये प्रस्तावित असलेल्या परीक्षांचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले. महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेची जाहिरात मेमध्ये प्रकाशित होईल आणि पूर्व परीक्षा जुलमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे तयारीसाठी किमान सहा महिने उपलब्ध आहेत हे लक्षात घेऊन अर्हताप्राप्त उमेदवारांनी तयारी सुरू केली पाहिजे.
मागील लेखांमध्ये भाषा घटकांच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. या व पुढील लेखांमध्ये सामान्य अध्ययन घटकातील उपघटाकाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येईल. या लेखामध्ये सामान्य अध्ययन घटकावर मागील प्रश्न पत्रिकांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे विश्लेषण व त्या आधारे विचारात घ्यायचे मुद्दे याबाबत चर्चा करण्यात येत आहे. काही प्रातिनिधिक प्रश्न पाहू. (योग्य उत्तराचे पर्याय ठळक करण्यात आले आहेत.)

* प्रश्न : एप्रिल २०१७ मध्ये भारत व बांग्लादेशमध्ये खालीलप्रमाणे करार करण्यात आले.
अ. भारत बांग्लादेशाला ३२,१४० कोटी रुपये देणार.
ब. शांतिपूर्ण कार्यासाठी परमाणू ऊर्जेचा वापर करणार.
क. तिस्ता नदी पाणीवाटपाचे योग्य समाधान करण्यात आले.
ड. एकूण २२ करार करण्यात आले.
वरीलपकी कोणते/ ती विधान /ने चुकीचे आहे/त
पर्यायी उत्तरे
१) फक्त ड २) फक्त क
३) अ व ड फक्त ४) क व ड फक्त
* प्रश्न : खालील विधाने विचारात घ्या.
अ. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या
अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.
ब. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या
अध्यक्ष व सदस्यांना गरवर्तनाच्या कारणावरून पंतप्रधान बडतर्फ करू शकतात.
क. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्यांचा कालावधी ५ वर्षे किंवा
६२ वर्षे यापकी जो आधी असेल
तो असा विहित केलेला आहे.
वरीलपकी कोणते/ ती विधान /ने चुकीचे आहे/त
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ २) अ आणि ब
३) फक्त क ४) ब आणि क
* प्रश्न : मानव धर्म सभेचे संस्थापक कोण होते?
१) महात्मा फुले
२) महात्मा गोविंद रानडे
३) लॉर्ड मेकॉले
४) गोपाळ कृष्ण गोखले

* प्रश्न : भारतात १९५१ साली प्रथम वर्गाची शहरे नऊ होती. त्यांची संख्या १९७१ आणि १९९१ साली किती झाली?
१) ११ आणि २७
२) १२ आणि १८
३) २८ आणि ३६
४) १८ आणि २७
* प्रश्न : शेती उद्योगामध्ये इ कॉमर्स म्हणजे काय?
१) वस्तू आणि सेवांची डिजिटल यंत्रणेमार्फत खरेदी व विक्री करणे
२) मालाची निर्यात करणे.
३) इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर करणे.
४) वरीलपैकी कोणतेही नाही.
* प्रश्न : ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने (१९७३) खालीलपकी कोणती योजना सर्वप्रथम राबविली होती?
१) SFDA २) रोहयो (EGS)
३) नरेगा (NREGA)

४) IRDP
* प्रश्न : हवेतील प्रदूषण हे वातावरणातील थेट अथवा अप्रत्यक्ष ——– बदलाचा विशिष्ट परिणाम आहे.
१) भौतिक
२) रासायनिक ३० जैविक
४) वरील सर्व
* प्रश्न : बचत गटांचा मुख्य उद्देश खालीलपकी कोणता आहे?
अ. अल्प बचतीचा प्रसार करणे
ब. मोठय़ा रकमेची कर्जे वितरित करणे
क. उत्पादक घटकांचे वाटप करणे
ड. अल्प प्रमाणावर कर्जे देणे
(छोटय़ा रकमेची)
वरीलपकी कोणते/ ती विधान /ने बरोबर आहे/त
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ
२) फक्त ब
३) क आणि ड फक्त
४) अ आणि ड फक्त
वरील प्रातिनिधिक प्रश्नांच्या आधारे पुढील बाबी लक्षात येतात.
४५ पकी किमान १४ ते १५ प्रश्न हे बहुविधानी आहेत.
एकूण नऊ उपघटकांसाठी प्रत्येक उपघटकासाठी प्रश्नसंख्या निश्चित केलेली नाही. मात्र सर्वात जास्त भर इतिहास, समाजसुधारक व ग्रामविकासावर आहे तर सर्वात कमी भर संगणक आणि माहिती तंत्रज्ञानावर आहे.
शाश्वत विकस आणि भारतीय अर्थव्यवस्था आणि तिच्यावरील उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचा परिणाम या उपघटकावर संकल्पनात्मक आणि तथ्यात्मक अशा दोन्ही प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले आहेत.
भारतीय राजकीय व्यवस्था या घटकावर बहुतांश प्रश्न हे बहुविधानी आणि नेमकी माहिती विचारणारे आहेत. चालू घडामोडींवरील प्रश्न बहुतांशपणे बहुविधानी आणि नेमक्या मुद्दय़ांची माहिती असेल तरच सोडविता येतील असे आहेत.
भारताच्या भूगोलावर सन २०१७ मध्ये सरळसोट पण नेमकी तथ्यात्मक माहिती विचारणारे आहेत तर सन २०१८ मध्ये संकल्पनात्मक आणि बहुविधानी अशा प्रकारचे आहेत.
एकूण प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण केल्यास एक बाब निश्चितपणे सांगता येते की उपघटकांवर किती, कशा प्रकारचे आणि स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात
येतील याचा नेमका अंदाज बांधता येत नाही. त्यामुळे संकल्पनात्मक, तथ्यात्मक आणि विश्लेषणात्मक अशा सर्व पलूंचा आढावा घेणे चालू घडामोडी, राज्यव्यवस्था, भूगोल, अर्थव्यवस्था आणि ग्रामविकास या उपघटाकांसाठी आवश्यक आहे.

## चालू घडामोडी सराव प्रश्न



3841 02-Dec-2019, Mon

Share

चालू घडामोडी हा सर्वच लेखी परीक्षांचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या व पुढील काही लेखामध्ये या घटकावरील सर्व प्रश्न देण्यात येत आहेत.

प्रश्न १- पुढीलपकी कोणते विधान अयोग्य आहे?

अ.  संसदेच्या वरिष्ठ सदनास 'राज्यसभा' हे नाव सन १९५०मध्ये देण्यात आले.

ब.  नोव्हेंबर २०१९मध्ये राज्यसभेचे २५०वे अधिवेशन सुरू झाले.

क. सन १९५२पर्यंत भारताची संसद एकसदनी होती.

पर्याय

१) केवळ अ  २) केवळ ब

३) केवळ क  ४) वरीलपकी नाही

प्रश्न २ – सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्काराबाबत पुढील विधानांचा विचार करा.

अ.  राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या कार्याबद्दल दिला जाणारा हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे.

ब.  सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीच्या वर्षी हा पुरस्कार स्थापन करण्यात आला.

क.  हा पुरस्कार व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांना त्यांच्या कार्याबद्दल देण्यात येतो.

वरीलपकी कोणते/ती विधान/ विधाने योग्य आहेत?

१) अ, ब आणि क तिन्ही

२) अ आणि ब

३) अ आणि क

४) ब आणि क

प्रश्न ३ – ३१ ऑक्टोबर या दिवसाशी पुढीलपकी कोणत्या बाबी संबंधित आहेत?

अ. आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी दिवस ब. राष्ट्रीय एकता दिवस

क. जागतिक शहरे दिवस  ड. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी

पर्यायी उत्तरे

१) अ, ब आणि क  २) ब आणि ड.  ३) अ, ब आणि ड  ४) ब, क आणि ड

प्रश्न ४ – भारताच्या संरक्षण दल प्रमुख पदाबाबत पुढीलपकी कोणते विधान बरोबर आहे?

१)  सॅम माणेकशॉ हे पहिले संरक्षण दल प्रमुख होते.

२)  संरक्षण दल प्रमुख हे पद यापूर्वी सन १९६२मध्ये अस्तित्वात आले.

३)  लष्कराच्या तिन्ही दलांमध्ये समन्वय साधणे हे या पदाचे मुख्य कर्तव्य आहे.

४)  राष्ट्रपतींना अण्वस्त्रांबाबत सल्ला देण्याचे कार्यही संरक्षण दल प्रमुख करतील.

प्रश्न ५ – पुढीलपकी कोणते/कोणती विधान/विधाने चूक आहे/त?

अ.  राज्यामध्ये विद्यार्थी दिवस ७ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येतो.

ब.  जागतिक विद्यार्थी दिन १० ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो.

पर्यायी उत्तरे

१) अ आणि ब दोन्ही

२) केवळ ब

३) केवळ अ

४) अ आणि ब दोन्ही नाही

प्रश्न ६ – देशातील टाळता येण्याजोग्या माता मृत्यू व अर्भकमृत्यूंचे प्रमाण शून्यावर आणण्याच्या उद्देशाने कोणती योजना केंद्र शासनाकडून सुरू करण्यात आली आहे?

१) सुमन योजना

२) उज्ज्वला योजना

३) संजीवनी योजना

४) जननी सुरक्षा योजना

प्रश्न ७ – सन २०१९मध्ये पुढीलपकी कोणत्या भारतीयाचे नाव आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघटनेकडून एका लघुग्रहास देण्यात आले आहे?

१) सी.व्ही.रामन
२) पंडित जसराज
३) महात्मा गांधी
४) ए.पी.जे. अब्दुल कलाम

उत्तरे व स्पष्टीकरणे

ल्ल प्र. क्र.१ – योग्य पर्याय क्र. (१). राज्यसभा स्थापना झाल्यावर सन १९५३ मध्ये संसदेच्या वरिष्ठ सदनाने ठराव करून राज्यसभा हे नामाभिधान स्वीकारले. राज्यसभा लोकसभेप्रमाणे दर पाच वर्षांनी विसर्जित होत नाही. हे संसदेचे स्थायी सदन आहे. दर दोन वर्षांनी राज्यसभेचे एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात आणि त्या जागांसाठी पुन्हा निवडणूक होते. प्रत्येक सदस्याचा कालावधी हा सहा वर्षांचा असतो.

प्र. क्र. २ – योग्य पर्याय क्र. (३) सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म १८७५ साली नाडियाद येथे तर मृत्यू सन १९७०मध्ये झाला. सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार सप्टेंबर २०१९मध्ये स्थापन करण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी ३१ ऑक्टोबर या सरदार पटेल यांच्या जयंतीच्या दिवशी जाहीर करण्यात येईल. तो पद्म पुरस्कारांसमवेत राष्ट्रपती भवनामध्ये प्रदान करण्यात येईल. यामध्ये पदक व मानचित्र यांचा समावेश आहे.

प्र. क्र. ३- योग्य पर्याय क्र. (४)

३१ ऑक्टोबर हा सरदार पटेल यांचा जन्म दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून सन २०१४पासून साजरा करण्यात येतो. सन २०१३पासून जागतिक शहरे दिवस हाही ३१ ऑक्टोबर रोजीच साजरा करण्यात येतो.

प्र.क्र. ४ – योग्य पर्याय क्र. (३) संरक्षण दल प्रमुख हे पद सन २०१९मध्ये निर्माण करण्यात आले. मात्र या पदाच्या आवश्यकतेबाबत १९९९च्या कारगील युद्धापासून चर्चा सुरू झाली. कारगील आढावा समितीने तसेच नरेश चंद्रा कृती दलाने या पदाच्या निर्मितीची शिफारस केली. पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री यांना संरक्षण आणि व्यूहात्मक बाबींमध्ये सल्ला देण्याचे कार्यही या पदाकडे आहे.

प्र. क्र. ५ – योग्य पर्याय क्र.(४)

७ नोव्हेंबर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन राज्यामध्ये तर १० ऑक्टोबर हा डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो.

प्र. क्र. ६ – योग्य पर्याय क्र.(१) सुरक्षित मातृत्व आश्वासन म्हणजेच

सुमन योजना ही प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानापेक्षा वेगळी योजना आहे. या योजनेमध्ये पुढील बाबी मोफत उपलब्ध करून देण्यात येतील- किमान चार प्रसूतीपूर्व तपासण्या,

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाअंतर्गत किमान एक तपासणी, फॉलिक ॲसिड गोळ्या, धनुर्वात लस, तपासणीसाठीचा प्रवास, इतर आवश्यक प्रसूतीपूर्व औषधे व नवजात अर्भकाच्या तपासणीसाठी सहा भेटी.

प्र. क्र. ७ – योग्य पर्याय क्र.(२)

मंगळ आणि गुरू यांच्या दरम्यान असलेल्या लघुग्रहाला पंडित जसराज यांचे नाव देण्यात आले आहे. यापूर्वी विश्वनाथन आनंदसहित एकूण ९ भारतीयांचे नाव लघुग्रहांना देण्यात आले आहे. असा सन्मान मिळणारे पंडित जसराज हे पहिले भारतीय संगीतकार आहेत.

## महाराष्ट्र कृषी सेवा पूर्वपरीक्षा मराठी प्रश्न विश्लेषण



447 02-Dec-2019, Mon

Share

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा सन २०१९मध्ये आयोजित करण्यात आली नव्हती. मात्र त्यापूर्वी ही परीक्षा नियमितपणे आयोजित झाल्याचे दिसते. त्यामुळे सन २०२०मध्ये ही परीक्षा आयोजित होण्याची दाट शक्यता आहे. पूर्वपरीक्षेतील प्रश्नांचे विश्लेषण व त्याआधारे तयारीबाबत या लेखापासून चर्चा करण्यात येईल. सन २०१७मध्ये नवीन पॅटर्न लागू झाल्यानंतर दोन वर्षे परीक्षा घेण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकांमधील मराठी घटकाच्या प्रश्नांचे विश्लेषण या लेखामध्ये करण्यात येत आहे. या दोन वर्षांतील काही प्रातिनिधिक प्रश्न पाहू.

(या प्रश्नांतील योग्य उत्तराचा पर्याय ठळक केलेला आहे.)

प्रश्न १. पुढीलपकी कोणता शब्द तत्सम नाही ते ओळखा.

१) गुरू २) पिता

३) कन्या ४) भाऊ

प्रश्न २. खालील अर्थाची म्हण पुढील पर्यायी उत्तरांतील कोणती आहे?

'राग अनावर झाला की, मनुष्य तो कोणावर तरी काढत असतो.'

१) मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची?

२) मांजराने दूध पाहिले, पण बडगा नाही पाहिला.

३) मांजरीचे दात तिच्या पिल्लास कधीच लागत नाहीत.

४) मांजर कावरते, खांबाला ओरबाडते.

प्रश्न ३. पुढील वाक्यातील अधोरेखित शब्द, सर्वनामाच्या कोणत्या प्रकारातील आहे, ते ओळखा. तिकडे कोण आहे ते मला माहीत नाही.

१) संबंधी सर्वनाम

२) अनिश्चित सर्वनाम

३) पुरुषवाचक सर्वनाम

४) दर्शक सर्वनाम

प्रश्न ४.

अ) अ-कारांत विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.

ब) विभक्ती प्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारांत विशेषणांचे सामान्य रूप याकारांत होते.

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर

३) अ आणि ब बरोबर ४) अ आणि ब चूक

प्रश्न ५. पुढील वाक्यांचे एका केवल वाक्यात रूपांतर करा.

अ. हा श्रीमंताचा पोर आहे.

ब. तो आहे खुळा.

क. आमची स्थिती तशीच आहे.

पर्यायी उत्तरे

१) हा श्रीमंताचा पोर खुळा आहे म्हणून आमची स्थिती तशीच आहे.

२) आमची स्थिती या श्रीमंताच्या खुळ्या पोरासारखीच आहे.

३) आमची स्थिती तशीच आहे, कारण श्रीमंताचा पोर खुळा आहे.

४) श्रीमंताचा पोर खुळा असल्यामुळे आमची स्थिती तशी आहे.

प्रश्न ६. योग्य क्रम लावा.

अ. कान फुंकणे (i) याचना करणे

ब. राम नसणे (ii) म्हातारपण

क. पिकले पान (iii)चुगली करणे

ड. हात पसरणे (iv) अर्थ नसणे

पर्यायी उत्तरे

१) अ-iv,, ब-i, क- ii ड-iii

२) अ- iii, ब-i, क-iv, ड -ii

३) अ- ii, ब-i, क-iv, ड-iii

४) अ- iii, ब- iv, क- ii , ड-i

वरील प्रातिनिधिक प्रश्नांच्या विश्लेषणावरून पुढील गोष्टी लक्षात येतात.

सन २०१७मध्ये सर्व १५ प्रश्न हे थेट (Straight forward) होते तर सन २०१८मध्ये बहुविधानी प्रश्नांची संख्या वाढली आहे.
भाषाविषयक आकलनावरील प्रश्नांचा विचार करता २०१७ मध्ये ५ तर २०१८ मध्ये ६ प्रश्न विचारलेले आहेत. सन २०१७मध्ये सर्व आकलनाचे प्रश्न हे म्हणी व वाक्प्रचार यांवर आधारीत होते. सर्वसामान्य शब्दसंग्रहावर एकही प्रश्न विचारलेला नव्हता. तर सन २०१८मध्ये म्हणी व वाक्प्रचार आणि सर्वसामान्य शब्दसंग्रहावर (समानार्थी शब्द किंवा शब्दार्थ अशा स्वरूपात) प्रत्येकी तीन प्रश्न विचारलेले आहेत.
अभ्यासक्रमामध्ये उताऱ्यावरील प्रश्नांचा उल्लेख असला तरी दोन्ही वर्षी या घटकाचा समावेश प्रश्नपत्रिकेमध्ये केलेला नाही. मात्र कोणत्याही घटकावरील प्रश्नांची संख्या आयोगाने निश्चित ठेवलेली नाही. हे पाहता या घटकाचा समावेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या घटकाचा सराव करणे टाळू नये.
वाक्यरचना हा व्याकरणाचाच भाग असला तरीही अभ्यासक्रमामध्ये वाक्यरचना आणि व्याकरण यांचा वेगवेगळा उल्लेख केलेला आहे. वाक्यरचनेवर दोन ते तीन प्रश्न विचारलेले दिसून येतात. काळ, प्रयोग आणि वाक्याचे प्रकार हे तीन घटक वाक्यरचनेवरील प्रश्नांसाठी विचारात घेता येतील.
व्याकरणावर ६ ते ७ प्रश्न विचारलेले दिसून येतात. शब्दांच्या जाती, विभक्ती, वचन, लिंग, सामान्य रूपे, शब्दांचे प्रकार इत्यादी घटकांचा व्याकरणामध्ये विचार करता येईल.
अभ्यासक्रमामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे प्रश्नांची काठिण्य पातळी ही शालांत (दहावी) परीक्षेच्या स्तराची आहे. त्यामुळे १५ पकी किमान १० ते १२ गुण मिळविणे हे उद्दिष्ट ठेवायला हरकत नाही. या विश्लेषणाच्या आधारे मराठी भाषा घटकाची तयारी कशी करावी याबाबत पुढील लेखामध्ये चर्चा करण्यात येईल.

## एमपीएससी मंत्र : महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा – मुख्य परीक्षा आणि मुलाखत




1350 27-Nov-2019, Wed

Share

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेच्या मुख्य परीक्षा आणि मुलाखतीबाबत या लेखामध्ये चर्चा करण्यात येत आहे.
मुख्य परीक्षा योजना
परीक्षेचे टप्पे दोन; लेखी परीक्षा व मुलाखत
एकूण गुण : ४५०; (१) लेखी परीक्षा – ४०० गुण, (२) मुलाखत – ५० गुण
प्रश्नपत्रिका – दोन, एक अनिवार्य व एक वैकल्पिक. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे
* वैकल्पिक विषय
* परीक्षेकरिता कृषी किंवा कृषी अभियांत्रिकी या दोन विषयांमधून कोणताही एक विषय मुख्य परीक्षेची माहिती सादर करताना निवडणे आवश्यक असते.
* आयोगाकडे माहिती सादर केल्यानंतर वैकल्पिक विषयांत कोणताही बदल करण्यास कोणत्याही परिस्थितीत परवानगी दिली जात नाही.
* लेखी परीक्षेचा निकाल
* वस्तुनिष्ठ स्वरूपांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातात. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांमागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतात.
* भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील, अशा रीतीने गुणांची किमान सीमारेषा निश्चित करण्यात येते.

* गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असते.
* प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या किमान किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येते.
* लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शतमत (ढी१ील्ल३ऱ'ी)पद्धत लागू आहे. परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या तुलनेत खालीलप्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशींसाठी पात्र ठरतात.
१. अमागास – किमान ३५ शतमत
२. मागासवर्गीय – किमान ३० शतमत
३. विकलांग – किमान २० शतमत
४. अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू – किमान २० शतमत
* विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांस दोन्हीपैकी
एकच सवलत घेता येते.
* पदांचा पसंतीक्रम
* पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारास खालील अटींवर देण्यात येते-
*पसंतीक्रम ऑनलाइन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात
आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक असते.
* पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जात नाही.
*आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे असे समजण्यात येते. त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येत नाही.
* मुलाखत
* मुलाखत ५० गुणांची असते.
*आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या आणि जाहिरातीतील तरतुदीनुसार अर्हतेच्या विहित अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येते.
* मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात / अधिसूचनेतील अर्हता / अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाते.
* विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येते तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येत नाही.
* वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतात.
* उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे? त्याची मानसिक कुवत किती आहे? हे आजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो. मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये आणखीही प्रश्नांचा समावेश असतो.
इतर प्रश्नांबरोबरच ज्यांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी कर्तव्य व जबाबदाऱ्या कोणत्या? उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली आहे त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी कोणत्या? ग्रामीण क्षेत्राच्या स्थितीबाबत त्याला असलेली माहिती आणि ग्रामीण जनतेच्या समस्या यासंबंधी प्रश्न यांचा समावेश असतो.
* अंतिम निकाल
लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त गुणांची एकत्रित बेरीज करून गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येते. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (फंल्ल'्रल्लत्रॄ) उमेदवारांना सर्वसामान्य सूचनेमध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येते.

## व्यक्तिविशेष सराव प्रश्न



1062 23-Nov-2019, Sat

Share

विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चालू घडामोडी हा विषय महत्त्वाचा असतोच. त्यातही अविभाज्य घटक म्हणून व्यक्ती विशेष हा घटक विचारात घेतला जातो. या लेखामध्ये या घटाकाबाबतचे सराव प्रश्न देण्यात आले आहेत.

प्रश्न १- साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ नाटककार आणि कादंबरीकार किरण नगरकर यांनी पुढीलपकी कोणत्या पुस्तकाचे लेखन केले?

अ)सात सक्कं त्रेचाळीस

ब) कॉन्फ्लिक्ट ऑफ लॉज

क) ककल्ड

ड) जसोदा

पर्याय

१)अ, ब, क २) अ, ब, ड

३) अ, क, ड ४) वरीलपकी सर्व

प्रश्न २ – पुढीलपकी अयोग्य विधान ओळखा

१) राम जेठमलानी यांचा जन्म सध्या पाकिस्तानात असलेल्या शिकारपूर येथे झाला होता.

२) वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी एलएलबीची पदवी घेतली.

३) त्यांनी एनडीए सरकारमध्ये कायदामंत्री म्हणून काम केले होते.

४) त्यांनी भारताचे महान्यायवादी म्हणून काम पाहिले.

प्रश्न ३- २०१९ चा ब्रिक्स-यंग इनोव्हेटर प्राईज पुरस्कार कोणाला देण्यात आला?

१)ओम मेहरा २) रवी प्रकाश ३) डॉ. राल्फ इव्हराई ४) केंटो मोमोटा

प्रश्न ४ – प्रा. मोहन आपटे यांच्याबाबत पुढीलपकी कोणते विधान योग्य आहे?

अ) त्यांनी खगोलशास्त्र, भौगोलिकशास्त्र, गणित, अवकाश, इतिहास, संगणक असे विविध विषयांवर लेखन केले आहे.

ब) मराठीबरोबरच त्यांनी इंग्रजीतून लेखन केले आहे.

क) 'मला उत्तर हवंय' ही त्यांची प्रसिद्ध पुस्तकमालिका आहे.

ड) भारतीय विद्याभवन सोमाणी महाविद्यालयात त्यांनी १९६६ ते १९९८ या काळात खगोलशास्त्राचे अध्यापन केले.

पर्याय

१) वरीलपकी सर्व २) अ, ब ३) अ, क ४) क, ड

प्रश्न ५ – माजी निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना पुढीलपकी कोणत्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते?

अ) रॅमन मॅगसेसे ब) पद्मश्री क) पद्मभूषण ड) पद्मविभूषण

पर्याय

१)अ, ब, ड २) अ, ब, क ३) अ, ड ४) वरीलपकी सर्व

प्रश्न ६ – जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पध्रेत सर्वाधिक सुवर्णपदके पटकावण्याचा विक्रम कोणाच्या नावावर आहे?

१)उसेन बोल्ट
२) लव्हलिना बोर्गोहेन
३) एलिसन फेलिक्स
४) जमुना बोरो

प्रश्न ८ – 'तुम्ही माझी स्वप्ने, माझे बालपण माझ्यापासून हिरावून घेतले.. तुमची िहमत कशी झाली?' असा जाब संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेसमोर पुढीलपकी कोणी विचारला?

१) मलाला युसुफझाई २) नादिया मुराद ३) ग्रेटा थुनबर्ग ४) वरीलपकी नाही

उत्तरे व स्पष्टीकरणे

प्रश्न १ – योग्य पर्याय क्र. ३
किरण नगरकर यांनी सात सक्कं त्रेचाळीस ही पहिली कादंबरी त्याचबरोबर जसोदा, कबीराचे काय करायचे यांसारख्या पुस्तकांचे लेखन केले. त्यांच्या ककल्ड या कादंबरीसाठी २००१ साली साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आले.

प्रश्न २ – योग्य पर्याय क्र. ४
राम जेठमलानी यांना साठीच्या दशकात तस्करांचे वकील म्हणून प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर आणीबाणीमध्ये त्यांच्या राजकीय कारकीर्दीस सुरुवात झाली. सन १९७७च्या निवडणुकांमध्ये ते लोकसभेवर निवडून गेले.

प्रश्न – योग्य पर्याय क्र. २
ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांसाठी स्वस्त आणि संपूर्ण स्वदेशी असे दूध शीतकरण यंत्र तयार करणाऱ्या भारताच्या रवी प्रकाश यांना ब्रिक्स – यंग इनोव्हेटर प्राइज पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

प्रश्न ४ – योग्य पर्याय क्र. १

प्रश्न ५ – योग्य पर्याय क्र. १
माजी निवडणुक आयुक्त टी.एन. शेषन यांना रॅमन मॅगसेसे (१९९६), पद्मश्री आणि पद्मविभुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी डिसेंबर १९९० ते डिसेंबर १९९६ या कालावधीत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले.

प्रश्न ६ – योग्य पर्याय क्र.३
ऑक्टोबर २०१९मध्ये दोहा येथे झालेल्या जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पध्रेत अमेरिकेच्या एलिसन फेलिक्स हिने उसेन बोल्टला मागे टाकत नवा इतिहास रचला. बोल्टच्या नावावर आतापर्यंत ११ सुवर्णपदके आहेत. तर एलिसनने या स्पध्रेत ४ बाय ४०० मीटर मिश्र रिले प्रकारात सुवर्णपदक जिंकवून देत सर्वाधिक म्हणजे १२ सुवर्ण पदके पटकावली.

प्रश्न ७ – योग्य पर्याय क्र. १. त्यानुसार योग्य जोडय़ा पुढीलप्रमाणे
दीपा मलिक – पॅरा अ‍ॅथलिट
बजरंग पुनिया – कुस्तीपट्ट
स्वप्ना बर्मन – अ‍ॅथलेटिक्स
फवाद मिर्झा – घोडेस्वार

प्रश्न ८ – योग्य पर्याय क्र. ३
नोव्हेंबर २०१९च्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेसमोर बोलताना ग्रेटा थुनबर्ग हिने हा प्रश्न उपस्थिताना केला. पर्यावरण चळवळीतील तिच्या योगदानासाठी तिला सन २०१९ चा राईट लाईव्हलीहूड पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय बाल शांतता पुरस्कार घोषित झाला. 'नो वन इज टू स्मॉल टू मेक अ डिफरन्स' हे तिच्या हवामान बदलावरील भाषणांचे संकलन असलेले पुस्तक प्रकाशित झाले आहे.

प्रश्न ७- राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०१९ चे विजेते आणि त्यांचे क्रीडा प्रकार यांच्या योग्य जोडय़ा लावा.
१) दीपा मलिक अ) घोडेस्वार
२) बजरंग पुनिया ब) अ‍ॅथलेटिक्स
३) स्वप्ना बर्मन क) पॅरा अ‍ॅथलिट
४) फवाद मिर्झा ड) कुस्तीपट्ट

प्रश्न ७- राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०१९ चे विजेते आणि त्यांचे क्रीडा प्रकार यांच्या योग्य जोडय़ा लावा.
१) दीपा मलिक अ) घोडेस्वार
२) बजरंग पुनिया ब) अ‍ॅथलेटिक्स

३) स्वप्ना बर्मन क ) पॅरा ॲथलिट
४) फवाद मिर्झा ड) कुस्तीपट्ट

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | III | IV | II | I |
| 2) | III | IV | I | II |
| 3) | III | I | IV | II |
| 4) | IV | III | II | I |

MPSC OFFICERS Apps
MPSC OFFICERS Blogs
HELP LINE

## महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा पूर्व परीक्षा



601 22-Nov-2019, Fri

Share

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेतून भरण्यात येणारी पदे, त्यासाठीच्या अर्हता, सर्वसाधारण परीक्षेचे स्वरूप याबाबत मागील लेखामध्ये चर्चा करण्यात आली. या आणि पुढील लेखामध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अभ्यासक्रम व गुणांकन इत्यादी बाबत चर्चा करण्यात येत आहे.
पूर्व परीक्षा योजना
प्रश्नपत्रिका एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे : पूर्व परीक्षा निकाल वस्तुनिष्ठ स्वरूपांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातात. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतात.
भरायच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील. अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येते. तद्नंतर, दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाते. तथापि अशा पद्धतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुसऱ्या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र ठरतात.
केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाते. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करून मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतात.

## एमपीएससी मंत्र : महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा



902 20-Nov-2019, Wed

Share

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विविध तांत्रिक पदांवर भरतीसाठी परीक्षा आयोजित करण्यात येतात. यापैकी त्या त्या क्षेत्रातील उमेदवारांमध्ये सर्वाधिक जागरूकता असलेल्या दोन परीक्षा आहेत – प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आणि महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा. राज्यातील पाच कृषी विद्यापीठे आणि त्यांना संलग्न कृषी महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे उमेदवार व त्यांच्या तयारीसाठी पोषक वातावरण दोन्ही लक्षणीय प्रमाणात आहेत. त्यामुळे कृषी सेवांच्या परीक्षांमध्ये अत्यंत स्पर्धात्मकतेने भाग घेतला जातो. सन २०१७ मध्ये कृषी क्षेत्रातील गट अ आणि ब संवर्गातील पदांसाठी एकत्रित परीक्षेचा नवा पॅटर्न लागू करण्यात आला आहे. त्यानंतर २०१७ व २०१८ मध्ये ही परीक्षा घेण्यात आली असली तरी २०१९ मध्ये घेण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२०मध्ये या परीक्षेच्या जाहिरातीची अपेक्षा करण्यास हरकत नाही. या लेखापासून महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेबाबत चर्चा करण्यात येत आहे.
संवर्ग व पदे याबाबतचा तपशील
राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र कृषी सेवेतील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदाच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.
* संवर्ग – गट- अ आणि गट -ब
* नियुक्तीचे ठिकाण –
महाराष्ट्रात कोठेही
* वेतनबँड व ग्रेड वेतन
* कृषी अधिकारी, गट अ – रुपये १५,६००- ३९,१००; ५,४००
अधिक नियमानुसार देय भत्ते
* कृषि अधिकारी गट ब – रुपये ९,३०० 2 ३४,८००; ४,६०० अधिक नियमानुसार देय भत्ते
* कृषि अधिकारी गट ब (कनिष्ठ)- रुपये ९,३०० – ३४,८००; ४,४०० अधिक नियमानुसार देय भत्ते
* उच्च पदावर बढतीची संधी – ज्येष्ठता आणि पात्रतेनुसार महाराष्ट्र कृषि सेवेतील वरिष्ठ पदावर
अर्हता
* मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्यात विद्याशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.
* प्रस्तुत भरतीसाठी खालील शैक्षणिक अर्हता शासनाने बी.एस.सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत.
१) बी.एस.सी (कृषी तंत्रज्ञान)
२) बी.एस.सी (कृषी व्यवसाय व्यवस्थापन)
३) बी.एस.सी (गृह विज्ञान)
४) बी.टेक (अन्नतंत्र)
५) बी.एफ.एस.सी.
६) बी.एस.सी(उद्यानविद्या)
* मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.
* पदवीच्या शेवटच्या वर्षांत
असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा शुल्क
सादर करायच्या अंतिम दिनांकापर्यंत
पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते.
* ज्या पदवीसाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील अनुभव आवश्यक
असतो अशा पदवीधारकाने मुख्य
परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असणे आवश्यक असते.
परीक्षेचे टप्पे
परीक्षा एकूण तीन टप्प्यांत घेण्यात येते.
* पूर्व परीक्षा
एकूण गुण २००
* प्रश्नपत्रिकेचे स्वरूप –

वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

* विषय – मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन व कृषीविषयक घटक
* मुख्य परीक्षा
* एकूण गुण – ४००

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

* प्रश्नपत्रिका – दोन
* पेपर एक (अनिवार्य)

विषय : कृषी- विज्ञान (२०० गुण)

* पेपर दोन (वैकल्पिक)

विषय : कृषी किंवा कृषी अभियांत्रिका

या दोन विषयांमधून कोणताही एक विषय

(२०० गुण)

* मुलाखत
* एकूण गुण – ५०

उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे त्याची मानसिक कुवत किती आहे. ते अजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो.

* मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादित सीमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते. पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जात नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.
* मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात. जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणाऱ्या व मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

पूर्व आणि मुख्य परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, गुणांकन इत्यादी बाबत पुढील लेखांमध्ये चर्चा करण्यात येईल.

All Rights Reserved @ Reliable Academy, Designed by Accunity Services.
Join Us

Whoops, looks like something went wrong.